The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत एकनाथ यांचे वाड्मयीन कार्य

डॉ लक्ष्मण बळीराम थिट्टे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्गता. तुळजापूर

**एकनाथ कालीन व पूर्व परिस्थिती:** मुस्लिमांची राजवट. इ.स.1214 दरम्यान अल्लाउद्दीन खिलजी यांनी देवगिरीवर स्वारी केली. इ.स.1318 पर्यंत यादवांची सत्ता संपुष्टात आली. यादव राजे रामदेव यांचा पराभव 1294 साली झाला. या समकाळात महाराष्ट्रात अनेक संत उद्यास आले. गोरा कुंभार 1267, नामदेव 1372, ज्ञानेश्वर समाधी 1296. 1347 साली गुलबर्गा येथे बहामनी राज्याची स्थापना झाली. सन १३१६ साली अल्लाउद्दीन खिलजी चा मृत्यू झाला नाथांचे जन्मगाव पैठण. त्या व नंतरच्या काळात ही पैठणला महाराष्ट्रात महत्त्वाचे स्थान होते. संस्कृत विद्येचे आगर. भानुदास त्यांचे पणजे चक्रपाणी आजे सूर्यनारायण वडील रुक्मिणी आई. जन्म शके 1450 साली झाला. त्यांच्या घराण्यात भागवत भक्ती ही पूर्वीपासून चालत आलेली होती. 1480 दरम्यान जनार्दन स्वामी कडून गुरुपदेश घेतला. उत्तरेकडे फार मोठा प्रवास केला. गिरजाबाई बरोबर विवाह. व्रत वैकल्ये इत्यादीवर टीका केल्यामुळे त्यांचा समाजाकडून छळ झाला. त्यांच्या जीवनात अनेक चमत्कारिक घटना घडल्या त्यांनी पाषाणाच्या नंदीला कडबा खाऊ घातला. वाळूमध्ये परिस सापडले. वयाच्या 66 व्या वर्षी शके पंधराशे एकवीस मध्ये नाथांनी देह ठेवला.

**साहित्य संपदा**

1) **चतु:श्लोकी भागवत:**-नाथांचा पहिला ग्रंथ या ग्रंथाची रचना तीर्थयात्रेच्या मार्गावर नाशिक येथे चंद्रभट्ट ब्राह्मणाच्या घरी उतरले. त्यावेळी चंद्रभटाने चतु:श्लोकावर पुराण सांगितले. भागवताच्या दुसऱ्या स्कंधा मधील नवव्या अध्यायाच्या 32- 35 या चार श्लोकावर नाथांनी 1036 ओव्यांचे भाष्य लिहिले, सृष्टी निर्मितीपूर्वी ब्रम्हदेवाने केलेल्या तपश्चर्याने श्री आदिनारायण प्रसन्न झाले त्यांनी जे ज्ञान सांगितले ते या चार श्लोकात आले आहे. ब्रह्मदेवाला सृष्टी निर्माण करण्याची इच्छा इच्छा पूर्ण. या ग्रंथातून एकनाथांची प्रतिभा शक्ती दिसून येते. स्वतंत्रदृष्टांत रूपके व विवेचन ही जागोजागी येते. ईश्वरभक्ती व गुरुभक्ती यावर भाष्य करणारा महत्त्वाचा ग्रंथ होय.

न करिता भागवत भक्ती तीर्थाटन संन्यास हे मार्ग एकनाथ वर्ज्य करतात. समतावादी दृष्टिकोन बाळगणारा ज्ञानेश्वरीचा प्रभाव या ग्रंथावर दिसून येतो. संस्कृत भाषा येत नसल्याचे जागोजागी नमूद केले आहे. अनेक व्यक्तिरेखा या ग्रंथात रेखाटल्या आहेत. उदाहरणार्थ ब्रह्मदेव, नारद. कर्मकांड या ग्रंथाने नाकारला आहे. या ग्रंथाबाबत डॉ तुळपुळे म्हणतात "संकोच वृत्तीने आणि गुरुकृपेच्या जाणिवेने नाथांनी काव्याच्या प्रांतात हे पहिले पाऊल टाकले आहे".

2) **एकनाथी भागवत:**- लेखन काळ शके 1475 दुसरा महत्त्वाचा ग्रंथ. हा ग्रंथ भागवताच्या एकादश स्कंधावर केलेले भाष्य आहे. श्रीकृष्ण आणि उद्धव या गुरु शिष्यातील संबंध या ग्रंथात आले आहेत. या ग्रंथाची ओवी संख्या 188 इतकी आहे भागवत धर्म शृंगार रुपात अभिव्यक्त करताना दिसतात. शंकराचार्यांना सुरुवातीस वंदन केले आहे. नाथांनी वर्णाश्रम धर्मास विरोध केला आहे. भक्तीला प्रेमाचे

स्थान. भक्ती हा महत्त्वाचा विषय या ग्रंथात मांडला आहे. प्रेमपूर्वक भक्तीयोग वेधशास्त्र संपन्न व्हायचे असेल तर भक्तीची नितांत गरज आहे. वेद पठण व नामस्मरण यांची तुलना, भक्ती आणि योग यांची तुलना केली आहे. उदाहरणार्थ **योगी इंद्रिय कोंडी** ती भक्ती आणि कर्ममार्ग यांची तुलना भक्ती ही निती आणि अनितीच्या पलीकडची सांगितली आहे. भागवत आणि ब्राह्मण धर्म यांची तुलना. मराठी भाषेचा अभिमान गौरविला आहे. श्रीकृष्ण उद्धव यांच्या व्यक्तिरेखा ही रेखाटले आहेत. लोक जीवनातील दृष्टांत या ग्रंथात येतात. या ग्रंथाविषयी अ. ना. देशपांडे म्हणतात "भागवत टीका म्हणजे महाराष्ट्रात वाहणारी गंगा आहे".

**3) भावार्थ रामायण**:- 297 अध्याय ओवी संख्या 40000 आहे. 172 अध्याय 25000 ओव्या संत एकनाथांनी लिहिल्या. राहिलेल्या ओव्या शिष्य गावबा यांनी लिहिल्या. दुसरा शिष्य जयराम आत्मजा याने 54 अध्याय जोडले. संत एकनाथांचे रामायण व वाल्मीकि रामायण यांचे उद्देश वेगळे आहेत. वाल्मीकि रामायण अध्यात्म रामायण राम विषयक संस्कृत नाटके यांचा आधार घेऊन हा ग्रंथ तयार केला.

**विषय-** रामाच्या वंशावळीचा उल्लेख केला आहे तत्कालीन संदर्भ या ग्रंथात येतात. शकून अपशकून संदर्भ येतो. शस्त्राचे प्रकार वर्णले आहेत. राम जन्माची कथा, दशरथाचे चार पुत्र पुत्र नसून ते चार पुरुषार्थ आहेत. एकनाथांची काव्यात्मक दृष्टी अनेक ठिकाणी दिसून येते. अलंकार, उपमेय वक्रोकती इत्यादी गुण त्यांच्या या ग्रंथात दिसून येते. सामाजिक संदर्भ येथे दिसून येतो. अनेक जातीचे संदर्भ येथे येतात. शृंगार वर्णनातून एकनाथांचा उथळपणा येथे दिसून येतो संपूर्ण रामाची कथा विस्ताराने सांगण्याचे श्रेय. नाथांनी भक्ती अध्यात्मक वीर वृत्तीचा साक्षात्कार घडवला आहे.

**4) रुक्मिणी स्वयंवर**:- 1493 ला काशीला हा ग्रंथ पूर्ण केला. मूळ कथा भागवताच्या दशम स्कंधावर आधारित आहे 144 शलोकांचा त्याच्या बाराशे बारा ओव्या केल्या. श्रीकृष्ण रुक्मिणीच्या प्रेमाची कथा या ग्रंथात आली आहे. जीव शिवाच्या ऐक्याची कथा आहे. या कथेत शृंगार, वीर, हास्य इत्यादी रस दिसून येतात. एकूण 18 प्रकरणे आहेत. एक ते सात प्रकरण रुक्मिणी हरण आठ ते तेरा युद्ध वर्णन, 14 ते 18 विवाह वर्णन अशी अद्यायाची विभागणी आहे. एकनाथांचे वर्णन सामर्थ्य, रूपक योजना यांच्या प्रत्यय येतो उदा. श्रीकृष्ण विवाह प्रसंग. या ग्रंथाविषयी श्री ल.रा. पांगारकर म्हणतात "ही मंगल कृष्ण कथा आहे म्हणून भाविक रमतो. तसेच जीव शिव ऐक्य प्रतिपादक अध्यात्म ग्रंथ आहे म्हणून ज्ञानी रमतो. व सुंदर विवाह वर्णन आहे म्हणून राक्षस रमतो".

**5) संत एकनाथांची अभंगवाणी:-** नाथांनी सुमारे 4000 अभंग लिहिले आहेत. नाथांची प्रासंगिक अभंग रचना केलेली. त्यांनी बाळ क्रीडेचे अभंग, पंढरी महात्म्य, संत महिमा, विठ्ठल महिमा, भक्त महिमा, भक्ती, उपदेश, नीती समाजोपदेश, इत्यादी विषयावर अभंग रचना केलेली आहे. **"माझे माहेर पंढरी बाप आणि आई माझी विठ्ठल रखुमाई"** हा अभंग असेल किंवा **"ओमकार स्वरूपा सद्गुरू समर्थ अनाथांच्या नाथा तुज नमो! नमो मायबापा गुरुकृपा धना तोडि या बंधना माई मोहा"** हा अभंग असेल अतिशय लोकप्रिय आहेत. प्रो रानडे लिहितात "नाथांचे इतर ग्रंथ बुद्धिवादाचे पण अभंग अनुभव प्रधान

आहेत संत एकनाथांची अभंगवाणी सरस आहे नाथांची नैतिक परमार्थिक आध्यात्मिक उंची त्यांच्या अभंगवाणीत अनुभवास मिळते कधीही भंग न पावणारी नाथांची अभंगवाणी त्यांची अभंग गाथा होय".

**6) भारुड** संत एकनाथ हे इतर साहित्यापेक्षा भारूड या प्रकारामुळे महाराष्ट्राला जास्त परिचित आहेत. त्यांचे अनेक भारुडे फार गाजली. संत एकनाथामुळेच भारुड हा प्रकार प्रसिद्धीस आला भारुड हे समाजाला उपदेश करण्यासाठी त्याची निर्मिती केली आहे. या शब्दावरून भारुड हा शब्द रूढ झाला असावा किंवा भरड या संस्कृत शब्दापासून तो आला असावा. भारुड म्हणजे प्राकृतामध्ये दोन तोंडाचा पक्षी. भारुडाचेही दोन अर्थ निघतात भारुड हे फक्त गायले जात नाही, तर ते अभिनयातूनही साकार होते. गीत, नृत्य, नाट्य, संगीत यांचा संगम होऊन हा प्रकार आकाराला येतो. भारुडाचेही दोन प्रकार आहेत. साधे भारुड व एकपात्री सोंगी भारुड अनेक पात्र मिळून. एकनाथांच्या भारुडांची संख्या 300 च्या आसपास आहे. त्यात 125 विषय सांगितले आहेत. जोहार 50, गोंधळ 12, गारुडी, वाघ्या मुरळी, खंडोबा, भराडी, बाळ संतोष, वासुदेव, पांगळा, जागल्या, बाईक, भूत, सासुरवास, संसार, भोळी आणि दादल्या या समस्याही भारुडातून येतात. भारुडातून उपदेश व परमार्थ साधला आहे.

**१) बाळ संतोष** "हिंडो सद्गुराच्याद्वारे भिक्षा मागून अलक्ष पुरी तेने तुटेल शौर्याऐंशीच्या फेरी शरण तुला जनार्दना"

**२) वासुदेव** "कर जोडूनी विनविती तुम्हा वासुदेव वासुदेव म्हणे नका गुंतू विषय वासना"

**३) सामाजिक स्तर** "कासरा लावून सासरा दादला टाकून आले काया वाचा रमले त्याची परिमेय ऐसा नाही देखिला दादला". **जोहार** निर्गुण कुडीचा महार, विठोबा पाटलाचा महार, रामजी पाटलांचा महार

**४)** काम, क्रोध, लोभ, मत्सर, "कामाजी देशमुख, मोठा मस्त क्रोधाजी नाईक मिळाले, दया मधाजी बुवा त्या शिकवित मत्सर स्वान पुढे भुकेले की मायबाप" शूद्र देवतांची उपवास करतात. त्यांच्यावर कडाडून टीका केली आहे. आधी माये वरील भारुड त्यामध्ये दार "उघड बया दार उघड" ब्राह्मण व महार यांचा संवादही त्यांच्या काही भारुडातून दिसून येतो गोड विषयावरील भारुड. भारुड मानवी दभावर प्रहार करतात. हिंदू मुसलमान दोही खुदा ने पैदा किया भाई असे ते म्हणतात समाजातील जातीय दरी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**योगदान** सामान्य माणसाच्या जवळ जाणारा जाण्याचा प्रयत्न करतात. अशिक्षित माणसाला भागवत संप्रदायात आणण्यासाठी त्यांनी आपल्या वाङ्मयाची निर्मिती केली आहे. लोकशिक्षक म्हणून संतांनी त्यांना संबोधले आहे. भारुडा विषयी डॉ बी एन पाटील म्हणतात, "संत एकनाथांनी भारुड रुपी लोकनाट्य काव्याद्वारे मानवी जीवनाचे साक्षात्कारी दर्शन घडविले आहे. मनोरंजनातून परमार्थ शिकविणारे संत एकनाथ खऱ्या अर्थाने लोक साहित्यकार होत". भागवत धर्माचे पुरस्कर्ते असले तरी इतर धर्माचा त्यांनी तिरस्कार केला नाही. हसत खेळत अध्यात्म सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रंथीक भाषेकडून लोकभाषेकडे लोक मने वळविण्याचा प्रयत्न हे त्यांच्या साहित्यातून दिसते.

**संदर्भ :** 1) डॉ श.गो. तुळपुळे- प्राचीन महाराष्ट्र वांग्मय वैभव.
2) डॉ ल. रा. नशिराबादकर:-मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास.
3) डॉ अ.ना. देशपांडे:-प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास.

**संत एकनाथ यांचे वाङ्मयीन कार्य**

डॉ लक्ष्मण बळीराम थिट्टे